आध्यात्मिक उपाय : दृष्ट – खंड १

# मीठ-मोहरी, नारळ, तुरटी आदींनी दृष्ट कशी काढावी ?

## (दृष्टविषयीच्या शास्त्रीय विवेचनासह)

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ

सौ. प्रियांका सुयश गाडगीळ आणि अन्य




**सनातन संस्था**


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना (२२ मार्च १९९९)

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १२.३.२०२५ पर्यंत १३१ साधक संत झाले, तर १,०५२ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती (वर्ष १९९५ पासून आरंभ)

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक (२८ एप्रिल १९९८ ते १९ एप्रिल २००० पर्यंत)

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाधीने संबोधले जात आहे. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

# सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्यांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



सौ. प्रियांका सुयश गाडगीळ

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. वर्ष २००३ पासून त्यांना मिळणारे हे ज्ञान सनातनच्या साधारणपणे ६० हून अधिक ग्रंथांत घेतले आहे. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्यांना वाईट शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.


---

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## ग्रंथ वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी पुढील प्रार्थना करा !

हे कुलदेवते (स्वतःच्या कुलदेवतेचे नाव घ्यावे) आणि श्री मारुतिराया, आपल्या कृपेने या ग्रंथातील विषय मला नीट समजू दे अन् त्यानुसार मला योग्य आचरणही करता येऊ दे !



# अनुक्रमणिका


卐 **‘दृष्ट’ या विषयाचे सामाईक मनोगत** ७

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ९

१. ‘दृष्ट लागणे’ म्हणजे काय ? १२

२. दृष्ट लागण्याची सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया १३

३. दृष्ट लागण्याचे परिणाम किंवा दृष्ट लागली आहे, हे ओळखण्याची लक्षणे १५

४. ‘दृष्ट काढणे’ म्हणजे काय ? १६

५. दृष्ट काढल्याने होणारे लाभ १७

६. दृष्ट काढण्याच्या प्रक्रियेत भाव महत्त्वाचा १८

७. दृष्ट काढणाऱ्या व्यक्तीवर दृष्ट निघण्याची फलनिष्पत्ती अवलंबून असणे १९

८. दृष्ट काढण्याची पद्धत (केवळ कृती) २१

९. दृष्ट काढण्याच्या पद्धतीमागील शास्त्र आणि अनुभूती २४

१०. दृष्ट काढण्यासाठी वापरले जाणारे घटक आणि त्यांद्वारे दृष्ट काढण्याच्या विविध पद्धती (मीठ, मोहरी, लाल मिरच्या, लिंबू, नारळ इत्यादी) २८

११. सतत साधना करणे, हाच दृष्ट न लागण्यावरचा खरा उपाय ६७

卐 **काही आनुषंगिक सूत्रे** ६८

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७२


---

**टीप** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## ‘दृष्ट’ या विषयाचे सामाईक मनोगत

बाळाला काजळाची तीट लावण्याचा संस्कार आजही जपला जातो. काही जुन्याजाणत्या स्त्रिया आलेल्या पाहुण्यावरून लिंबलोण आजही उतरवतात. परंपरा जेव्हा शतकानुशतके जपल्या जातात, तेव्हा त्यांमागे निश्चित काहीतरी शास्त्र असते, हे आपण समजून घ्यायला हवे.

सध्याच्या स्पर्धात्मक आणि भोगवादी युगात ईर्षा, द्वेषभाव, लोकेषणा, भिन्नलिंगी व्यक्तींकडे पहाण्याची वाईट दृष्टी यांसारख्या विकृतींनी बहुतांश व्यक्ती ग्रासलेल्या आहेत. या विकृतीजन्य रज-तमात्मक स्पंदनांचा त्रासदायक परिणाम सूक्ष्मातून नकळत दुसऱ्या व्यक्तींवर होतो. यालाच त्या व्यक्तींना ‘दृष्ट लागणे’ असे म्हणतात. तसेच कुटुंबात भांडणे, व्याधी, आर्थिक चणचण, वाईट स्वप्ने पडणे, नैराश्य, सिगारेट किंवा मद्य यांचे व्यसन यांसारख्या समस्या आता नित्याच्या झाल्या आहेत. जीवनातील ८० टक्के समस्यांमागील कारणे सकृद्दर्शनी स्थुलातील दिसत असली, तरी खरे मूळ कारण हे सूक्ष्मातील, म्हणजेच वाईट शक्तींचा त्रास, हे असते. वाईट शक्तींचा त्रास हाही दृष्ट लागण्याचाच प्रकार होय.

थोडक्यात, जीवन समस्यांरहित आणि आनंदी बनवायचे असेल, तर ‘दृष्ट काढणे’ हा सोपा घरगुती आध्यात्मिक उपाय अवलंबणे केव्हाही उपयुक्त ठरते. सध्याच्या विज्ञानयुगात वावरतांना ‘दृष्ट लागणे आणि दृष्ट काढणे’, हे शब्द उच्चारले, तरी बुद्धीजीवी लोक त्याला ‘पुरातन पद्धत’, असे हिणवून नाक मुरडतील. विज्ञानयुगात प्रत्येक गोष्ट शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडल्यास तिच्यावर लगेच विश्वास बसतो. त्यामुळे दृष्टविषयीच्या ३ खंडांत लागण्याची प्रक्रिया, विविध घटकांनी दृष्ट काढण्याच्या पद्धती, बाळाची दृष्ट काढण्याच्या सोप्या पद्धती, दृष्ट काढतांना घ्यावयाची काळजी इत्यादी विशद करतांना स्थूल माध्यमांतून न समजणाऱ्या गोष्टी ‘सूक्ष्म परीक्षणे’ आणि ‘सूक्ष्म ज्ञानाविषयीची चित्रे’ यांद्वारे स्पष्ट केल्या आहेत.

सनातनचे साधक समष्टी साधना करून ‘ईश्वरी राज्य’ स्थापन

करण्यासाठी प्रयत्न करत आहेत, तर वाईट शक्ती 'आसुरी राज्य' स्थापन करण्यासाठी प्रयत्नरत आहेत. त्यामुळे वाईट शक्ती साधकांना विविध प्रकारे मोठ्या प्रमाणावर त्रास देतात. दृष्ट काढण्यापूर्वी असलेली साधकांची स्थिती, दृष्ट काढल्याने त्यांच्यावर झालेला परिणाम आणि त्यांना झालेले लाभ हे सनातनच्या साधकांना आलेल्या अनुभूतींतून मांडले असल्याने दृष्ट काढण्याची पद्धत शास्त्रशुद्ध असल्याचे सप्रमाण सिद्धही झाले आहे.

दृष्ट काढण्याचे महत्त्व लक्षात घेऊन अधिकाधिक जणांनी दृष्ट काढून स्वतःभोवती निर्माण झालेले त्रासदायक स्पंदनांचे आवरण दूर करावे आणि साधनेने ब्रह्मांडातील ईश्वरी लहरींचा लाभ करून घ्यावा, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**


## शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी सोपा मार्ग दर्शवणारे सनातनचे ग्रंथ !

## गुरुकृपायोगानुसार साधना



कर्म, भक्ती आणि ज्ञान या योगमार्गांचा त्रिवेणी संगम म्हणजे 'गुरुकृपायोग' ! या ग्रंथात 'गुरुकृपायोगाचे महत्त्व, या योगमार्गामुळे इतर योगमार्गांच्या तुलनेत शीघ्र होणारी आध्यात्मिक उन्नती, मृत्यूनंतरही जिवावर असणारी गुरुकृपा' यांसारख्या विविधांगी विषयांवर मार्गदर्शन केले आहे.

## गुरुकृपायोगाचे माहात्म्य

गुरुकृपेच्या माध्यमातून जिवाला ईश्वरप्राप्ती होणे, याला 'गुरुकृपायोग' असे म्हणतात. या ग्रंथात 'गुरुकृपायोगातील साधनेचे सिद्धांत, टप्पे, तसेच गुरुकृपेसाठी व्यष्टी आणि समष्टी साधना यांचा समन्वय साधून साधना कशी करावी ? त्यासाठी आवश्यक गुण कोणते ?', यांचेही विवरण दिले आहे.